# इतिहास – राज्यशास्त्र

## उत्तरे : सराव कृतिपत्रिका 1 ली

**प्र. 1. (अ)**

(1) सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाचे जतन व संवर्धन व्हावे; या हेतूने युनेस्को या जागतिक संघटनेने दिशादर्शक तत्त्वे जाहीर केलेली आहेत.

(2) महाराष्ट्राचे आद्य कीर्तनकार संत नामदेव यांना मानतात.

(3) लिओनार्दो-द-विंची या जगप्रसिद्ध इटालियन चित्रकाराने रेखाटलेल्या 'मोनालिसा' या चित्राचा समावेश लुव्र संग्रहालयात आहे.

**प्र. 1. (ब) चुकीच्या जोड्या :**


(1) द्वंद्ववादी पद्धती – हिरोडोटस

(2) हडप्पा संस्कृतीचा शोध – जेम्स मिल.


(3) महाराज सयाजीराव विद्यापीठ – दिल्ली.

**प्र. 2. (अ)**


**(1)**




**(2)**



(3)




**प्र. 2. (ब)**

**(1) राष्ट्रवादी इतिहासलेखन :**

(१) एकोणिसाव्या शतकात भारतात इंग्रजी शिक्षणपद्धती सुरू झाली. या पद्धतीत शिकून तयार झालेल्या इतिहासकारांना भारताच्या वैभवशाली प्राचीन इतिहासाविषयीची जाण आली. आत्मजाणीव निर्माण झालेल्या या इतिहासकारांनी भारताविषयी जे इतिहासलेखन केले, त्या लेखनास 'राष्ट्रवादी इतिहासलेखन' असे म्हणतात.

(२) या राष्ट्रवादी इतिहासलेखकांनी प्राच्यवादी लेखकांच्या पूर्वग्रहदूषित इतिहासलेखनाला विरोध केला.

(३) भारताच्या इतिहासातील सुवर्णकाळ शोधून त्यावर त्यांनी लेखन केले.

(४) राष्ट्रवादी इतिहासलेखनामुळे ब्रिटिशांविरुद्धच्या स्वातंत्र्यलढ्यास प्रेरणा मिळाली; तसेच प्रादेशिक इतिहास लिहिण्यालाही चालना मिळाली.

**(2) उपयोजित इतिहास :**

(१) एखादा विषय इतर क्षेत्रांमध्ये लागू करणे व त्यातून निघणारे निष्कर्ष प्राप्त करणे, म्हणजे 'उपयोजन' होय.

(२) इतिहासाची उद्दिष्टे इतर विषयांना लागू करून नवीन निष्कर्ष काढणे, यालाच 'इतिहासाचे उपयोजन' असे म्हणतात.

(३) इतिहासाद्वारे भूतकाळातील घटनांसंबंधीचे जे ज्ञान प्राप्त होते, त्याचा उपयोग वर्तमानात आणि भविष्यकाळात सर्व समाजाला कसा होईल, याचा विचार उपयोजित इतिहासात केला जातो.

(४) इतिहासात सामाजिक, धार्मिक, कला, स्थापत्य इत्यादी घटक समाविष्ट असतात; तसे या विषयांमध्येही इतिहासाचे उपयोजन होते.

**(3) देशी खेळ :**

(१) ज्या खेळांचा उदय भारतात झाला आणि ज्या खेळांना भारतीय परंपरा आहे, अशा खेळांना 'देशी खेळ' असे म्हणतात.

(२) देशी खेळांत बैठे खेळ आणि मैदानी खेळ असे दोन प्रकार आहेत. जे खेळ बसून कोठेही खेळता येतात, त्यांना 'बैठे खेळ' असे म्हणतात; तर जे खेळ मैदानात उभे राहून खेळावे लागतात, त्यांना 'मैदानी खेळ' असे म्हणतात.

(३) बुद्धिबळ, सारीपाट, पत्ते इत्यादी देशी बैठे खेळ; तर आट्यापाट्या, खो-खो, कबड्डी, कुस्ती वगैरे देशी मैदानी खेळ होत.

(४) देशी खेळांचे वैशिष्ट्य म्हणजे या खेळांना जास्त किमतीचे साहित्य लागत नसल्याने हे खेळ कमी खर्चीक असतात. फुगडी, झिम्मा, भातुकली असे मुलींचे देशी खेळ आहेत. आधुनिक काळात मुलीही मुलांच्या बरोबरीचे सर्व देशी व विदेशी खेळ खेळतात.

**प्र. 3.**

**(1)** (१) ऐतिहासिक साहित्यात फारसी ग्रंथ, ताम्र-शिलालेख, कागदपत्रे, नाणी, प्रवासवर्णने इत्यादी साधनांबरोबर ऐतिहासिक बखरींचाही समावेश होतो.

(२) बखरीत शूर योद्ध्यांचे गुणगान असते. ऐतिहासिक घडामोडी आणि युद्धांची वर्णने असतात.

(३) थोर पुरुषांची चरित्रे आणि त्या काळातील नगरांची वर्णने असतात.

(४) तत्कालीन सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक जीवनाचे चित्र रंगवलेले असते. ही वर्णने इतिहासलेखनाला उपयुक्त ठरतात; म्हणून 'बखर' हा ऐतिहासिक साहित्यातील महत्त्वाचा प्रकार आहे.

**(2)** (१) कालप्रवाहात विविध विचारसरणींचा उगम होत असतो.

(२) या विचारसरणींचा समाजावर विविध काळात कमी-जास्त प्रभाव पडलेला असतो.

(३) या विविध विचारसरणींचा उगम कसा झाला, त्यामागील वैचारिक परंपरा कोणत्या होत्या, यांचा शोध घेण्याची गरज असते.

(४) या विचारसरणींच्या वाटचालींचा, त्यांच्या विकास-विस्ताराचा किंवा अधोगतीचा इतिहास समजून घेणे आवश्यक असते; म्हणून तत्त्वज्ञानाचा इतिहास अभ्यासण्याची गरज असते.

**(3)** (१) बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी मुंबईत 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरू केले.

(२) मराठी भाषेतून सुरू केलेले हे पहिले वृत्तपत्र होते.

(३) या वृत्तपत्राचे संपादक या नात्याने बाळशास्त्री जांभेकर हे आद्यसंपादक होत.

(४) जांभेकरांनी 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरू करून मराठी वृत्तपत्रसृष्टीचा पाया घातला. म्हणून दर्पणचा पहिला अंक प्रसिद्ध झालेला '६ जानेवारी' हा दिवस महाराष्ट्रात 'पत्रकार दिन' म्हणून साजरा केला जातो.

**(4)** (१) भारतात पाश्चात्त्यांच्या वैद्यकीय सुविधांपेक्षा दर्जेदार व स्वस्त वैद्यकीय सुविधा मिळतात.

(२) नवीन तंत्रज्ञान व तज्ज्ञ सर्जन भारतात उपलब्ध आहेत. त्यामुळे रोगमुक्त होण्याची खात्री परकीयांना वाटते.

(३) भारतात सूर्यप्रकाश मुबलक असल्याने त्याचा लाभ घेण्यासाठी परदेशी लोक येथे येतात.

(४) योगशिक्षण आणि आयुर्वेदिक उपचार ही तर भारताने जगाला दिलेली देणगीच आहे. असे विविध वैद्यकीय उपचार घेण्यासाठी परदेशी लोकांचे भारतात येण्याचे प्रमाण वाढलेले दिसते.

**प्र. 4.**

**(1)** 'सीतास्वयंवर' हे नाटक विष्णुदास भावे यांनी रंगभूमीवर आणले.

**(2)** गोविंद बल्लाळ देवल हे 'संगीत शारदा' या नाटकाचे लेखक आहेत.

**(3)** (१) नाटक हा दृक्-श्राव्य कलाप्रकार असल्यामुळे त्याचा प्रेक्षकांवर फार मोठा प्रभाव पडतो.

(२) समाजामध्ये असलेल्या रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, कर्मकांडे इत्यादी अनिष्ट बाबी नाटकांद्वारे सादर करून सामाजिक प्रबोधन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य नाटकांनी केले.

(३) 'संगीत शारदा' या नाटकातून जरठ-कुमारी विवाह या क्रूर प्रथेवर प्रकाश टाकला गेला.

(४) राम गणेश गडकरी यांनी 'एकच प्याला' या नाटकातून दारूच्या दुष्परिणामांची जाणीव समाजाला करून दिली.

**प्र. 5.**

**(1)** (१) स्त्रीवादी इतिहासलेखन म्हणजे स्त्रियांच्या दृष्टिकोनातून केलेली इतिहासाची पुनर्रचना होय.

(२) इतिहासाच्या लेखनात पुरुषवादी दृष्टिकोनाचाच प्रभाव अधिक होता.

(३) त्यावर पुनर्विचार करावा आणि त्यात स्त्रियांचा अंतर्भाव करावा, अशी भूमिका फ्रेंच विदुषी सीमाँ-द-बोव्हा हिने मांडली.

(४) त्यानंतर स्त्रीवादी इतिहासलेखन हा विचार स्वीकारला गेला.

(५) स्त्रियांशी संबंधित नोकऱ्या, रोजगार, ट्रेड युनियन्स, स्त्रियांचे कौटुंबिक जीवन, स्त्री संस्था या सर्वांवर सविस्तर संशोधन सुरू झाले.

(६) १९९० नंतर 'स्त्री' हा एक स्वतंत्र सामाजिक वर्ग मानून इतिहास लिहिण्यावर भर दिला जाऊ लागला. या दृष्टिकोनालाच 'स्त्रीवादी इतिहासलेखन' असे म्हणतात.

**(2)** (१) अश्मयुगीन काळापासून गुहाचित्रांची परंपरा चालू आहे. या गुहाचित्रांतून लोकचित्रशैलीचे जतन केले गेले.

(२) गुहाचित्रांमध्ये प्राणी, मनुष्याकृती, झाडे, शिकारीचे प्रसंग अशी चित्रे गुहांच्या भिंतींवर कोरलेली आढळतात.

(३) अश्मयुगीन मानवाच्या प्रगतीच्या वाटचालीत चित्रांचे विषय बदलत गेले. नवीन प्राणी, शेतीजीवन, वनस्पती इत्यादी नवीन विषय येत गेले.

(४) मनुष्याकृतींच्या रेखाटनांच्या पद्धतीत व चित्रांमध्ये वापरल्या गेलेल्या रंगांमध्ये फरक होत गेला.

(५) नैसर्गिक द्रव्यांपासून तसेच वनस्पतींच्या पानांपासून तयार केलेले विविध रंग वापरले गेलेले दिसतात. सभोवतालचा परिसर आणि अवगत झालेले नवनवीन ज्ञान व तंत्रज्ञान यांचा वापर करून मानव चित्रे कोरू लागला.

(६) नवाश्मयुगात विकसित झालेला मानव देव-देवतांची चित्रे काढू लागला. सणसमारंभप्रसंगी घरांच्या भिंतींवर चित्रे काढणे, अंगणात रांगोळी काढणे अशा स्थानिक परंपरांतून लोकचित्रशैली विकसित झाली. वारली चित्र परंपरा, चित्रकथी परंपरा, लघुचित्र परंपरा अशा अनेक लोकचित्रकला शैली आढळतात.

**(3)** खेळ आणि इतिहास यांच्यातील परस्परसंबंध घनिष्ठ आहेत. –

(१) खेळांवर लिखाण करणाऱ्या लेखकांना त्या खेळांचा इतिहास माहीत असावाच लागतो.

(२) खेळाची समीक्षा करण्यासाठी त्या समीक्षकाला भूतकाळातील खेळाडूंच्या खेळाचे कौशल्य माहीत असावे लागते.

(३) ऑलिम्पिक, एशियाड, राष्ट्रकुल अशा आंतरराष्ट्रीय स्पर्धांची माहिती, खेळाडूंची वैशिष्ट्ये असा संदर्भ देण्यासाठी समीक्षकाला इतिहासाचा आधार घ्यावाच लागतो.

(४) विविध स्पर्धांचे आकाशवाणीवरून, दूरदर्शनवरून वा वाहिन्यांवरून समालोचन करताना समालोचकाला त्या खेळाचा इतिहास, गाजलेले खेळाडू, त्यांचे विक्रम इत्यादींसंबंधी माहिती द्यावी लागते, तरच त्याचे समालोचन रंजक होते.

(५) खेळातील विशेष तज्ज्ञ म्हणून बोलावलेल्या व्यक्ती, खेळाडूंच्या प्रशिक्षणासाठी असणारे प्रशिक्षक, स्पर्धांसाठी खेळाडूंची निवड करणारी समिती या सर्वांना खेळाडूंची माहिती, त्यांचे गुण व दोष, विरुद्ध चमूतील खेळाडूंचा इतिहास या सर्वांचा अभ्यास करावा लागतो.

(६) खेळाडूंनाही आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा इतिहास माहीत असावा लागतो. थोडक्यात, खेळाशी संबंधित सर्व घटकांना खेळाचा इतिहास माहीत करून घ्यावाच लागतो.

**(4)** ग्रंथालये आणि संग्रहालये ही राष्ट्राचा चालताबोलता जिवंत इतिहास असतो. त्यामुळे राष्ट्रासाठी त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण असते –

(१) ग्रंथालये व संग्रहालये यांच्यामुळे अभ्यासकाला इतिहासलेखन करणे सुलभ जाते.

(२) ऐतिहासिक घटना व व्यक्तींची चरित्रे सामान्य लोकांपर्यंत पोहोचतात.

(३) भूतकालीन सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक परिस्थितीची कल्पना येते.

(४) वस्तुसंग्रहालये पाहिल्याने कला व अभिरुची यांत वाढ होते.

(५) इतिहासाबद्दलच्या पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनात बदल होतो.

(६) प्राणी, कीटक, पक्षी, निसर्गघटक यांची माहिती होते.

(७) ज्ञानार्जन आणि ज्ञानप्रसाराला हातभार लागतो.

(८) प्राचीन ऐतिहासिक साधनांचे जतन होते.

(९) मनोरंजन आणि पर्यटनाला चालना मिळते.

(१०) व्यवसाय आणि रोजगार मिळण्यास मोठी संधी प्राप्त होते.

या विविध कारणांसाठी ग्रंथालये आणि संग्रहालये प्रत्येक राष्ट्रासाठी आवश्यक असतात. दोन्हीही राष्ट्रांच्या प्रगतीची आणि वैभवाची प्रतीके असतात.

**(टीप :** उत्तरात कोणतेही सहा मुद्दे लिहिणे अपेक्षित आहे.**)**

**प्र. 6.**

**(1)** हुंडा प्रतिबंधक कायद्याद्वारे महिलांना त्यांचे स्वातंत्र्य जपण्यासाठी आणि स्वत:चा विकास साधण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण केले आहे.

**(2)** लोकशाहीमध्ये राजकीय पक्ष निवडणुकीत सामील होऊन सत्तेत प्रवेश करतात.

**प्र. 7.**

**(1)** हे विधान बरोबर आहे; कारण–

(१) काही वेळा विधानसभेचा किंवा लोकसभेचा एखादा सदस्य आपल्या प्रतिनिधित्वाचा राजीनामा देतो.

(२) एखाद्या प्रतिनिधीचे अकस्मात निधन होते.

(३) निर्वाचित सदस्याने पक्षांतर केले, तर पक्षांतरबंदी कायद्याप्रमाणे त्याचे सदस्यत्व रद्द होते. अशा वेळी त्या मतदारसंघाची कामे कोण करणार हा प्रश्न निर्माण होतो; म्हणून निवडणूक आयोग त्या जागेसाठी पोटनिवडणूक घेतो.

**(2)** हे विधान चूक आहे; कारण–

(१) १९८९ च्या निवडणुकीनंतर कोणत्याही पक्षाला बहुमत न मिळाल्याने आघाडी सरकारे केंद्रात व राज्यात अधिकारावर आली.

(२) पक्षांचा आपापला कार्यक्रम बाजूस ठेवून समान कार्यक्रमावर, भूमिकेवर एकत्र येऊन हे पक्ष सरकार चालवू लागले.

(३) १९७७ च्या जनता पक्षाचा प्रयोग फसल्यानंतर आता केंद्र व राज्य पातळीवर आघाडी शासन चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. म्हणून आघाडी शासनातून अस्थिरता निर्माण होते, हा समज खोटा ठरला आहे.

**(3)** हे विधान बरोबर आहे; कारण–

(१) सार्वजनिक प्रश्नांच्या निराकरणासाठी एक वा अनेक व्यक्ती संघटित होऊन सामूहिक आंदोलन उभे करतात.

(२) सामाजिक प्रश्नांसंदर्भातील सर्व माहिती आंदोलनातील कार्यकर्ते शासनाला देत असतात.

(३) चळवळीच्या वाढत्या प्रभावामुळे शासनाला त्याची दखल घ्यावीच लागते.

(४) शासनाच्या निर्णयांना, धोरणांना विरोध करण्यासाठी चळवळी उभ्या राहतात. लोकशाही पद्धतीतच जनतेला प्रतिकार करण्याचा हक्क असतो; म्हणून लोकशाहीमध्ये चळवळींना फार महत्त्व असते.

**प्र. 8. (अ)**

**(1) हक्काधारित दृष्टिकोन :**

(१) स्वतंत्र भारताने लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला. ही पद्धती देशात अधिकाधिक रुजावी, प्रगल्भ व्हावी यासाठी सत्तेवर आलेल्या प्रत्येक शासनाने प्रयत्न केले.

(२) लोकशाहीकरणासाठी सुधारणा करताना नागरिकांकडे केवळ 'लाभार्थी' म्हणून पाहण्याचा सुरुवातीला या सरकारांचा दृष्टिकोन होता.

(३) इ.स. २००० नंतरच्या काळात मात्र 'नागरिकांचा हक्क' ही भूमिका घेऊन या सुधारणा होऊ लागल्या.

(४) म्हणून प्रत्येक नागरिकाला माहितीचा, शिक्षणाचा तसेच अन्नसुरक्षेचा केवळ लाभ व्हावा; म्हणून कायदे केले गेले नाहीत; तर ते नागरिकांचे हक्क मानले गेले. या भूमिकेलाच 'हक्काधारित दृष्टिकोन' असे म्हणतात.

**(2) राष्ट्रीय पक्ष :**

राष्ट्रीय पातळीवर कार्यरत असणाऱ्या पक्षांना 'राष्ट्रीय पक्ष' असे म्हणतात. राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळण्यासाठी निवडणूक आयोगाने पुढील निकष ठरवले आहेत—

(१) किमान चार राज्यांमध्ये शेवटच्या लोकसभा निवडणुकीत किंवा विधानसभेच्या निवडणुकीत किमान ६ टक्के मते मिळणे आवश्यक. किंवा


(२) किमान चार सभासद लोकसभेत निवडून येणे आवश्यक आहे. किंवा

(३) आधीच्या लोकसभेच्या निवडणुकीत किमान तीन राज्यांमध्ये मिळून लोकसभेच्या एकूण जागांपैकी २ टक्के जागा निवडून येणे आवश्यक. किंवा


(४) किमान चार राज्यांमध्ये राज्यपातळीवरील पक्ष म्हणून मान्यता मिळणे आवश्यक आहे.

**प्र. 8. (ब)**

**(1)**




**(2)**



**प्र. 9.**

**(1)** सामाजिक न्याय प्रस्थापित करणे, म्हणजे –

(१) ज्या सामाजिक बाबींमुळे, विचारांमुळे व्यक्तींवर वा काही लोकसमूहांवर अन्याय होतो, त्या बाबी वा ते विचार नष्ट करणे.

(२) व्यक्ती म्हणून सर्वांचा दर्जा समान मानणे व तशी धोरणे आखणे.

(३) जात, धर्म, भाषा, लिंग, वंश, जन्मस्थान, संपत्ती इत्यादींवर आधारित श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेद न करता समान वागणूक देणे.

(४) सर्वांना विकासाची समान संधी देणे.

**(2)** भारतात लोकशाहीच्या यशासाठी पुढील बाबींची आवश्यकता आहे –

(१) लोकशाही निर्णयप्रक्रियेत सर्व धार्मिक, वांशिक, भाषिक व जातीय गटांना सहभागी होण्याची संधी मिळाली पाहिजे.

(२) राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखण्यासाठी कडक शिक्षा असणारे कायदे असावेत व असे गुन्हेगारीकरण रोखणारी स्वतंत्र न्यायालये असावीत.

(३) केवळ शासकीयच नव्हे; तर सामाजिक आणि वैयक्तिक पातळीवरही लोकशाही यशस्वी होण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

(४) शासनव्यवहारात सर्व पातळ्यांवरील नागरिकांचा सहभाग वाढला पाहिजे.

---